राष्ट्रीय मासिक

# विश्वात्मक लोकस्वामी वार्ता

RNI No.MAHBIL/2019/79644

POSTAL REGD.NO. MCW 348/2024-26

Published on 10th of Every Month

Posted at Dharavi Post Office,Mumbai-400 017 on 15th of Every Month.

•www.vishwatmaklokswamivarta.com •वर्ष : ७ वे • अंक : ११ • मुंबई, सप्टेंबर २०२६ •पृष्ठ : १२ •मूल्य :₹३/-• संपादक : चंद्रशेखर लिंगय्या स्वामी

'विश्वात्मक लोकस्वामी वार्ता' युट्यूब चॅनल ला बातमी, मुलाखत, लाईव्ह म्हणजे महाराष्ट्रासह देशातील तळागाळापर्यंत पोहचणे मग आजच आम्हाला संपर्क करा आणि आपले हक्काचे मत मांडा

YouTube Channel

@chandrashekarswami1786

Like Share SUBSCRIBE

## व्यापारासाठी नौकानयनाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे-पंतप्रधान



**नवी दिल्ली :** जागतिक व्यापाराला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौकानयनाचे स्वातंत्र्य आणि खलाशी यांच्या सुरक्षेचे आवाहन केले.

'ब्रिक्स बिझनेस फोरम' मध्ये बोलताना ते म्हणाले, 'समुद्री मार्ग सुरक्षित असतील, पुरवठा साखळी मोकळी राहील आणि खलाशी सुरक्षित असतील तरच जागतिक व्यापार पुढे जाऊ शकतो. म्हणूनच भारत नौकानयनाच्या स्वातंत्र्याचा आणि खलाशांच्या सुरक्षेचा खंबीर पुरस्कर्ता आहे.' जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारत हा विकास आणि स्थिरतेचा विश्वासार्ह स्रोत आहे, असे सांगून मोदी पुढे म्हणाले की, संपूर्ण जगात व्यापारावर बंधने/अडथळे येत असताना भारत आर्थिक संबंध दृढ करत आहे.

त्यांनी 'ब्रिक्स बिझनेस कौन्सिल'ला १० व्यापार अडथळे दूर करण्याबाबत अहवाल तयार करण्याचे आणि दरवर्षी १०० ब्रिक्स स्टार्टअप्सना त्यांचा विस्तार करण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले. तसेच कौन्सिलला १,००० नवीन भागीदाऱ्या विकसित करण्याची विनंती त्यांनी केली. या निकषांवर आपल्याला दरवर्षी प्रगतीचा आढावा घ्यावा लागेल, असेही ते म्हणाले.या मंचवर बोलताना इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियन म्हणाले की, जग सध्या भू-राजकीय अनिश्चिततेच्या अत्यंत गुंतागुंतीच्या टप्प्यातून जात आहे. त्यांनी ब्रिक्स सदस्यांमधील व्यापारात राष्ट्रीय चलनांचा वापर वाढवण्याची सूचना केली.

## पनवेल : कर्जत २९.६ किमी उपनगरी मार्गिकेचे ९९ टक्के काम पूर्ण

**मुंबई :** पनवेल : कर्जतदरम्यान नवा उपनगरीय रेल्वे मार्ग पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आला आहे. आता अंतिम तांत्रिक चाचण्या आणि रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या (सीआरएस) मंजुरीनंतर लोकल सेवा सुरू करण्याची तयारी सुरू आहे. एमआरव्हीसीने प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले असले तरी, प्रवासी सेवा सीआरएसच्या मंजुरीनंतरच सुरू होणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी ३) अंतर्गत पनवेल : कर्जत दुहेरी रेल्वे मार्गिका उभारण्याचे काम हाती घेतला आहे. सध्या या प्रकल्पाची ९९ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. २,७८२ कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे पनवेल-कर्जतदरम्यान पर्यायी उपनगरी रेल्वेमार्ग उपलब्ध होणार असून नवी मुंबई, कर्जत परिसरातील रेल्वे संपर्क अधिक सक्षम होईल. सध्या थेट उपनगरी रेल्वे जोडणी नसल्याने प्रवाशांना अधिक वेळ खर्च करावा लागतो. ही मार्गिका सुरू झाल्यानंतर पनवेल-कर्जत प्रवासाचा कालावधी कमी होणार आहे.




## सध्या प्रकाशित झालेली प्रारूप मतदार यादी ही अंतिम मतदार यादी नाही :

### मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय



**मुंबई :** राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीबाबत काही माध्यमांमध्ये चुकीचे दावे करण्यात आल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. काही वृत्तांमध्ये प्रारूप मतदार यादीतील मतदारसंख्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मतदान केलेल्या मतदारांपेक्षा कमी असल्याचे म्हटले गेले. मात्र, ही तुलना दिशाभूल करणारी असून सध्याच्या टप्प्यातील यादी ही अंतिम नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यात अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर संबंधित मतदार प्रत्यक्षात वास्तव्यास आहे की नाही, याची पडताळणी करण्यात आली. त्यामुळे दिलेल्या पत्त्यावर वास्तव्यास नसलेले किंवा इतरत्र स्थलांतरित झालेले मतदार तात्पुरते प्रारूप यादीत समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. तसेच, मृत मतदारांची नावेही यादीतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे प्रारूप यादीतील आकडेवारी आणि पूर्वीच्या अंतिम मतदार यादीची थेट तुलना करणे योग्य नसल्याचे आयोगाने नमूद केले आहे.

## तिन्ही सैन्यदलातील शूरवीरांना सरकारची भेट; आयुष्यभर मोफत रेल्वे प्रवास



**मुंबई :** केंद्र सरकारने तीनही सैन्यादलांतील शौर्य पुरस्कार विजेते आणि त्यांच्या पात्र कुटुंबीयांसाठी आयुष्यभर मोफत रेल्वे प्रवासाची सुविधा सुरू केली आहे. या लाभांतर्गत प्रथम श्रेणी, द्वितीय एसी आणि एसी चेअर कारमधील प्रवासाचा समावेश असून हा लाभ त्यांच्या कुटुंबातील काही विशिष्ट श्रेणीतील सदस्यांना मिळणार आहे. भारताच्या शूर जवानांचा सन्मान करणाऱ्या एका ऐतिहासिक निर्णयात, केंद्र सरकारने भूदल, नौदल आणि वायुसेनेच्या शौर्य पदक विजेत्यांसाठी आयुष्यभर मोफत रेल्वे प्रवासाला मंजुरी दिली आहे. हा लाभ त्यांच्या कुटुंबातील काही विशिष्ट श्रेणीतील सदस्यांपर्यंत देखील वाढवला जाईल. हा निर्णय देशाच्या शूरवीरांसाठी एक मोठा कल्याणकारी निर्णय आहे. अद्भुत शौर्य दाखवणाऱ्यांच्या कुटुंबीयांना सन्मान आणि पाठबळ मिळावे, हा यामागचा उद्देश असल्याचेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. शौर्य पुरस्कार विजेते: सैन्यादलातील सर्व कर्मचारी ज्यांना शौर्य पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे. पती/पत्नी: मृत पुरस्कार विजेत्याची विधवा किंवा विधुर (पुनर्विवाह करेपर्यंत पात्र). पालकः मरणोत्तर पुरस्कार दिला गेला आहे आणि पुरस्कार विजेता अविवाहित होता, तेथे आईवडील या लाभासाठी पात्र असतील.

## बँक बदलण्यासाठी फास्टॅगची 'वन टॅग' सुविधा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा




**मुंबई :** फास्टॅगचा वापर करणाऱ्या वाहनधारकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. फास्टॅगशी संबंधित बँक बदलण्यासाठी आता वाहनावरील जुना फास्टॅग काढून नवीन फास्टॅग घेण्याची गरज लागणार नाही. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ मध्ये वन टॅग ही नवीन सुविधा लाँच करत असल्याची घोषणा केली आहे. या सुविधेमुळे वाहनधारकांना आपला चालू एनईटीसी फास्टॅग कायम ठेवून त्याच फास्टॅगशी संबंधित बँक बदलता येईल.वनटॅग ही सुविधा इंडियन हायवेज मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे बँक बदलल्यानंतरही वाहनांवर लावलेला तोच फास्टॅग वापरता येणार आहे. आतापर्यंत एखाद्या ग्राहकाला फास्टॅगची बँक बदलायची असल्यास त्याला आधी जुना फास्टॅग बंद करावा लागत होता.वन टॅग सुविधेमधील सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बँक बदलल्यानंतरही फास्टॅगचा टॅग आयडी आणि वाहनाचा नोंदणी क्रमांक बदलणार नाही.

## ग्रामीण भागात २५ दिवसांनी सिलेंडर बुक करता येणार

**मुंबई :** जागतिक बाजारातील घडामोडी आणि पुरवठा साखळीतील बदलांचा परिणाम देशातील गॅस वितरण आणि दरांवर होत असतो. ग्राहकांच्या गरजा तसेच बाजारातील परिस्थितीचा विचार करत सरकारने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता ग्रामीण भागातील ग्राहकांनाही अवघ्या २५ दिवसांच्या अंतराने घरगुती LPG सिलेंडरचे रिफिल बुक करता येणार आहे. केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी लागू असलेली ४५ दिवसांची बुकिंगची अट हटवली आहे. त्यामुळे आता ग्रामीण आणि शहरी भागातील सिलेंडर बुकिंगसाठी २५ दिवसांचे अंतर समान राहणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा बदल तातडीने लागू करण्याचे निर्देश देशातील सर्व ऑइल मार्केटिंग कंपन्यांना देण्यात आले आहेत.अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धादरम्यान LPG पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला होता. त्यामुळे ९ मार्च २०२६ रोजी शहरी भागात रिफिल बुकिंगमधील अंतर २५ दिवस, तर १२ मार्च रोजी ग्रामीण भागात हे अंतर ४५ दिवस करण्यात आले होते.सध्या LPG पुरवठ्याच्या स्थितीत सुधारणा झाली आहे आणि प्रलंबित बुकिंगची संख्याही कमी झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांवर लागू असलेले हे निर्बंध हटवण्याचा निर्णय घेतला आहे.

## सं पा द की य

# भक्तीपलीकडचा सामाजिक जागराचा उत्सव गणेशोत्सव

'गणपती बाप्पा मोरया!' या जयघोषाने वातावरण भारून जाते आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात नवचैतन्य निर्माण होते. श्रीगणेशाचे आगमन म्हणजे केवळ एका धार्मिक उत्सवाची सुरुवात नव्हे, तर आनंद, उत्साह, एकोपा, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम होय. बुद्धी, विवेक, समृद्धी आणि मंगलकार्याचे प्रतीक असलेल्या गणरायाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहणारा समाज आजही या उत्सवातून अनेक मूल्ये जपत आहे. गणेशोत्सवाची परंपरा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाशी जोडलेली आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप देऊन समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्या काळात गणेशोत्सव हा जनजागृतीचा आणि सामाजिक संघटनाचा प्रभावी माध्यम बनला. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणता येते आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देता येते, हा विचार त्यातून पुढे आला. आज शंभराहून अधिक वर्षांनंतर गणेशोत्सवाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. शहरांपासून गावापर्यंत भव्य मंडप, आकर्षक रोषणाई, कलात्मक सजावट, देखावे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध सामाजिक उपक्रम यामुळे उत्सवाची व्याप्ती वाढली आहे. घरगुती गणपतीपासून सार्वजनिक गणेशोत्सवापर्यंत प्रत्येक ठिकाणी उत्साह ओसंडून वाहताना दिसतो. मात्र या बदलत्या स्वरूपाबरोबरच काही प्रश्नही आपल्यासमोर उभे राहिले आहेत. गणेशोत्सव म्हणजे भक्ती की दिखावा? श्रद्धा की स्पर्धा? उत्सव की ध्वनिप्रदूषण? अशा प्रश्नांचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी लाखो रुपये खर्च करून भव्य सजावट करणे चुकीचे नाही; परंतु त्यामागे केवळ प्रतिष्ठेची स्पर्धा निर्माण होत असेल तर उत्सवाचा मूळ हेतू हरवण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाची खरी श्रीमंती मंडपाच्या भव्यतेत नसून समाजासाठी केलेल्या विधायक कार्यात आहे. आज पर्यावरणाचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. नद्या, तलाव आणि समुद्र यांचे प्रदूषण, प्लास्टिकचा वाढता वापर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे ही केवळ चांगली कल्पना नसून सामाजिक जबाबदारी आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंग, कागद किंवा कापडापासून केलेली सजावट, प्लास्टिकला पर्याय आणि कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन यांसारख्या उपायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. 'देव निसर्गात आहे' असे आपण मानतो; मग गणरायाच्या उत्सवामुळे निसर्गाचे नुकसान होणे ही मोठी विसंगती ठरते. म्हणूनच गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करताना जितकी श्रद्धा आवश्यक आहे, तितकीच विसर्जनाच्या वेळी पर्यावरणाची काळजी घेणेही आवश्यक आहे. 'माझा गणपती, माझी जबाबदारी' ही भावना प्रत्येक भक्ताच्या मनात निर्माण झाली पाहिजे. ध्वनिप्रदूषणाचाही मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. उत्सवात संगीत, ढोल-ताशे आणि आरती यांना निश्चितच स्थान आहे; परंतु आनंद साजरा करताना इतर नागरिकांच्या आरोग्याचा आणि शांततेचा विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्ण यांचा विचार करून ध्वनीची मर्यादा आणि वेळेचे भान राखले पाहिजे. उत्सवाचा आनंद दुसऱ्याच्या त्रासाचे कारण ठरू नये. गणेशोत्सव हा सामाजिक एकतेचा उत्सव आहे. एका मंडपाखाली विविध जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्तर आणि विचारांचे नागरिक एकत्र येतात. हीच या उत्सवाची सर्वात मोठी ताकद आहे. आज समाजात विविध कारणांमुळे निर्माण होणारे मतभेद कमी करण्यासाठी अशा सामूहिक उत्सवांची भूमिका महत्त्वाची आहे. गणरायाच्या चरणी नतमस्तक होताना मनातील भेदभाव दूर करण्याचा संकल्प केला, तर गणेशोत्सवाची खरी फलश्रुती साधता येईल. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही काळानुसार आपली भूमिका अधिक व्यापक करण्याची गरज आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, महिला सुरक्षा, वाहतूक शिस्त, व्यसनमुक्ती, डिजिटल साक्षरता आणि नागरिकांच्या हक्कांविषयी जनजागृती अशा उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. मनोरंजनासोबत समाजप्रबोधन करणारे मंडळ हेच खऱ्या अर्थाने आदर्श मंडळ ठरेल. ■■■

# गणेशोत्सव...परंपरेचा, आपुलकीचा आणि नव्या जाणिवांचा उत्सव



सिंधुदुर्ग म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो निळाशार समुद्र, हिरवीगार डोंगररांग, लाल मातीची वाट, कौलारू घरे, अंगणातली तुळस आणि माणसांच्या मनात जपलेली आपुलकी. या भूमीच्या सांस्कृतिक जीवनात अनेक सण-उत्सवांना विशेष स्थान आहे; मात्र गणेशोत्सवाची गोष्ट काही वेगळीच आहे. कारण इथे गणपती म्हणजे केवळ देवघरात विराजमान होणारी मूर्ती नाही, तर घराला पुन्हा घरपण देणारा, माणसांना पुन्हा एकत्र आणणारा आणि गावाला पुन्हा जिवंत करणारा उत्सव आहे.

श्रावण सुरू झाला की कोकणात गणेशोत्सवाची चाहूल लागते. घरांची साफसफाई सुरू होते, मखराची तयारी होते, अंगण सजते, बाजारपेठा गजबजतात आणि दूरवर नोकरी-व्यवसायासाठी गेलेल्या माणसांच्या परतीची वाट पाहिली जाते. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई किंवा राज्याच्या इतर भागांत राहणारा कोकणवासी गणपतीसाठी आपल्या गावच्या घराकडे परततो. वर्षभर दूर असलेली भावंडे, नातेवाईक, मित्रमंडळी पुन्हा एकत्र येतात. सिंधुदुर्गाच्या गणेशोत्सवाचे हेच कदाचित सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे—बाप्पा येतो आणि माणसं जवळ येतात.

सिंधुदुर्गातील गणेशोत्सव हा म्हणूनच श्रद्धेबरोबरच कुटुंब, गाव आणि परंपरेचा उत्सव आहे. जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरांमध्ये गणेशचतुर्थीला महत्त्वाचे स्थान असून भजन, फुगड्या आणि विविध लोककला या उत्सवाशी जोडलेल्या आहेत. गावागावांत गणेशोत्सवाच्या काळात वातावरण भक्तिमय करणाऱ्या भजनांच्या तालमी आधीपासून सुरू होतात. अभंग, गौळणी, गजर आणि पारंपरिक वाद्यांचा नाद उत्सवाला वेगळीच रंगत देतो.

या परंपरेत आपल्या मातीचा सुगंध आहे. घरगुती गणपती, गौरीचे आगमन, आरती, नैवेद्य, मोदक, भजन, फुगड्या, नातेवाईकांच्या भेटीगाठी, लहान मुलांचा उत्साह, आजी-आजोबांच्या आठवणी आणि गावच्या मंडळींचे सामूहिक नियोजन—या सगळ्यांनी मिळून सिंधुदुर्गाचा गणेशोत्सव आकार घेतो. कुठे घरातील ज्येष्ठ व्यक्ती परंपरा सांगते, कुठे आई किंवा आजी मुलांना नैवेद्याची पद्धत शिकवते, तर कुठे तरुण मंडळी सजावट, आयोजन आणि डिजिटल माध्यमांची जबाबदारी सांभाळतात. अशा प्रकारे प्रत्येक पिढी आपापल्या पद्धतीने उत्सवात सहभागी होते.

राज्यशासनाच्या वतीने आता गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचे स्वरूप देण्यात आले असून त्यानिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याची संकल्पना पुढे आली आहे. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गणेशोत्सवाशी संबंधित रील्स व डिजिटल उपक्रम, प्रमुख गणेशस्थळांचे ऑनलाइन दर्शन आणि विविध क्षेत्रांतील स्थानिक सहभागाला प्रोत्साहन देण्याची दिशा निश्चित करण्यात आली आहे.

या सगळ्या उपक्रमांचा अर्थ उत्सव मोठा, भव्य किंवा खर्चिक करणे एवढाच नाही. उलट, आपली परंपरा जपत उत्सव अधिक अर्थपूर्ण कसा करता येईल, हा त्यामागचा खरा विचार आहे.

गणेशोत्सव मंडळांनी यंदा आपल्या परिसरातील पारंपरिक कला आणि स्थानिक संस्कृतीला सजावटीचा आणि कार्यक्रमांचा केंद्रबिंदू बनवावे. सिंधुदुर्गची दशावतार लोककला, स्थानिक हस्तकला, पारंपरिक वाद्ये, कोकणी-मालवणी संस्कृती, गावचा इतिहास, स्थानिक देवस्थाने, किल्ले, लोकपरंपरा अशा विषयांवर देखावे, प्रदर्शन, कथाकथन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. सिंधुदुर्गच्या सांस्कृतिक ओळखीत दशावताराबरोबर चित्रकथी, गंजिफा, कोळीनृत्य आणि विविध ग्रामपरंपरांना महत्त्व आहे.

मुलांसाठी गणपती म्हणजे आनंदाचा सण. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा उत्सव घडविणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा, गणेशोत्सवावरील चित्रकला, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, पारंपरिक खेळ, प्रश्नमंजुषा किंवा स्थानिक इतिहासावर आधारित उपक्रम घेता येतील. तरुणांसाठी डिजिटल डिझाइन, रील्स, छायाचित्रण आणि माहितीपट निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देता येतील. ज्येष्ठ नागरिकांकडून गावच्या गणेशोत्सवाच्या जुन्या आठवणी ऐकून त्या नव्या पिढीपर्यंत पोहोचविता येतील. गणेशोत्सव म्हणजे फक्त मनोरंजन नव्हे; तो पिढ्यांना जोडणारा सांस्कृतिक दुवा आहे.

यंदा या दुव्याला पर्यावरणाची जोड देऊया. बाप्पाच्या स्वागतासाठी शाडू मातीची किंवा पर्यावरणपूरक मूर्ती निवडणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक साहित्याने सजावट करणे, निर्माल्य वेगळे संकलित करणे आणि शक्य तिथे पर्यावरणपूरक विसर्जनाची व्यवस्था करणे, हे प्रत्येक घर आणि मंडळाला सहज शक्य आहे. फुले, पाने, नारळाच्या झावळ्या, बांबू, कापड, कागद, माती आणि स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून केलेली सजावट ही दिसायलाही सुंदर असते आणि आपल्या मातीतल्या परंपरेशीही जोडलेली असते.

विसर्जन हा भावनेचा क्षण आहे. त्यामुळे तो तितक्याच जबाबदारीने साजरा करणे गरजेचे आहे. जलस्रोत स्वच्छ राहावेत, पाण्याला आणि निसर्गाला हानी पोहोचू नये, निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्रपणे संकलित करावे, याची काळजी घेऊया. आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करणे, हा देखील पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, निर्माल्य संकलन, पुनर्वापर आणि प्लास्टिकमुक्त उत्सवासाठी व्यापक जनजागृती करण्याची दिशा यंदाच्या उपक्रमांमध्येही अधोरेखित करण्यात आली आहे.

ऊर्जेची बचत हा देखील उत्सवाचा एक सुंदर संकल्प होऊ शकतो. सजावटीसाठी दिवसभर अनावश्यक विद्युत रोषणाई ठेवण्याऐवजी गरजेपुरतीच रोषणाई, एलईडी दिव्यांचा वापर, शक्य असल्यास सौरऊर्जेवर आधारित सजावट आणि वेळेचे नियोजन यामुळे उत्सवाचा आनंद कमी होत नाही; उलट जबाबदार उत्सवाची नवी ओळख निर्माण होते. ऊर्जा बचतीचा संदेश देणारा गणेशोत्सव ही पुढच्या पिढीसाठीची चांगली शिकवण ठरेल.

उत्सव हा समाजाला जोडण्यासाठी असतो. म्हणून मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक बचत गट, कारागीर, कलाकार, शेतकरी, लघुउद्योजक आणि स्थानिक उत्पादनांना स्थान देता येईल. गणेशमूर्ती, मखर, सजावट, पूजासाहित्य, पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला किंवा स्थानिक कलाकृती यांना प्रोत्साहन दिल्यास उत्सवाचा आनंद गावच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावू शकतो. महिलांच्या बचत गटांना स्थानिक खाद्यपदार्थ किंवा प्रसादाच्या उपक्रमात सहभागी करून घेता येईल. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे म्हणजे आपल्या संस्कृतीला पुढे नेणे होय. अशा स्थानिक सहभागाची दिशाही प्रस्तावित उपक्रमांमध्ये आहे.

आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्सवातील प्रत्येकाचा सहभाग. एखाद्या मंडळाचा उत्सव केवळ काही कार्यकर्त्यांचा न राहता तो संपूर्ण परिसराचा उत्सव व्हावा. ज्येष्ठांसाठी सांस्कृतिक मैफल, महिलांसाठी पारंपरिक खेळ किंवा कौशल्य प्रदर्शन, मुलांसाठी सर्जनशील उपक्रम, तरुणांसाठी क्रीडा व डिजिटल स्पर्धा आणि सर्वांसाठी सामूहिक आरती, भजन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम उत्सवाला सर्वसमावेशक बनवू शकतात. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता आणि गरजूंसाठी मदत अशा छोट्या उपक्रमांमधून उत्सवाचे सामाजिक रूप अधिक सुंदर करता येईल. ■■■

## थोडक्यात

### मध्य रेल्वेच्या ४३ स्थानकांवर 'इमर्जन्सी मेडिकल रूम'




**मुंबई :** प्रवासादरम्यान रेल्वे आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी मध्य रेल्वेने उपनगरीय नेटवर्कवरील ४३ स्थानकांवर 'इमर्जन्सी मेडिकल रूम' (ईएमआर) उभारण्याची योजना आखली आहे. यासाठी १८ ते २३ सप्टेंबरदरम्यान एकत्रित ई-लिलाव प्रक्रिया राबवली जाणार आहे. कल्याण येथील मध्य रेल्वे रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधीक्षकांच्या कार्यालयाने ११ सप्टेंबरला दिलेल्या उत्तरात सध्याच्या सुविधा आणि आगामी विस्ताराची सविस्तर माहिती दिली. सध्या मुंबई उपनगरीय रेल्वे नेटवर्कवर १२ आपत्कालीन वैद्यकीय कक्ष कार्यरत आहेत. यातील कल्याण, भायखळा आणि वाशी येथील ३ कक्ष वैद्यकीय विभागामार्फत चालवले जातात, जिथे 'ॲनी फाऊंडेशन' ऑगस्ट २०२२ पासून सेवा देत आहे. उर्वरित ९ कक्ष -कर्जत, कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, घाटकोपर, ठाणे, भांडुप, कांजूरमार्ग, डोंबिवली आणि टिटवाळा येथे असून ते व्यावसायिक विभागामार्फत चालवले जातात.

**प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न**

उपनगरीय रेल्वेवर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना ही पावले उचलली जात आहेत. मुख्य मार्गिकेवर चालत्या लोकलमधून प्रवासी खाली पडण्याच्या घटनांमध्ये २५० टक्क्यांनी वाढ झाली. हार्बरवर अशा घटनांमध्ये घट झाली तर पश्चिम रेल्वेवर कोणताही बदल झालेला नाही.

### २५ हजार पगार असणाऱ्यांनाही पीएफ आणि पेन्शन

**मुंबई :** केंद्र सरकारने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसंदर्भात (ईपीएफ) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पीएफ आणि पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी वेतन मयार्दा दरमहा १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपयांपर्यंत वाढवली आहे. यासंदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज निर्णय घेण्यात आला. याचा लाभ ५१ लाखांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना होणार आहे. यापूर्वी सप्टेंबर २०१४मध्ये वेतन मयार्देत बदल करण्यात आला होता. आता नव्या वेतन मयार्देनुसार, मूळ वेतन आणि महागाई भत्ता मिळून २५ हजारांपर्यंत ज्यांचे वेतन आहे, त्यांना लाभ मिळेल.सध्या ईपीएफओचे ७.८९ कोटी सदस्य आहेत. नव्या नियमानुसार आणखी ५१ लाखांपेक्षा जास्त सदस्य जोडले जाऊ शकतात. योगदान देणाऱ्या ७.६८ लाख कंपन्या आणि संस्था असून ८२ लाख पेन्शनधारक आहेत.

### रिक्षा-टॅक्सीप्रमाणे नियम बंधनकारक

**मुंबई :** मागणी वाढली की भाडे वाढविणाऱ्या ॲपआधारित टॅक्सी कंपन्यांच्या मनमानीला आता चाप बसण्याची शक्यता आहे. ॲपआधारित टॅक्सी चालकांनाही रिक्षा आणि पारंपरिक टॅक्सीप्रमाणे परिवहन विभागाच्या नियमांच्या चौकटीत आणण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार शासनाने निश्चित केलेल्या भाडेदरानुसारच प्रवाशांकडून शुल्क आकारावे लागणार असून, चालकांची ओळख, वास्तव्य आणि कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना परिवहन विभागाचा बॅज देण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र ॲग्रीगेटर धोरण २०२६'च्या अंमलबजावणीच्या निमित्ताने ॲपआधारित टॅक्सी सेवांवर सरकारचे नियमन अधिक कडक होणार आहे.

# पालिकेच्या सर्व उपाहारगृहांवर आता प्रशासनाचा कडक वॉच! 'एफडीए'च्या धर्तीवर अन्न सुरक्षा व स्वच्छतेची तपासणी होणार

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॅन्टीनसह सर्व विभागांच्या उपाहारगृहांवर आता प्रशासनाचा 'कडक वॉच' राहणार आहे. यासाठी प्रशासनाकडून सरप्राइज व्हिजिट करून तपासणी केली जाणार आहे. यासाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांना अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने तयार केला आहे.'एफडीए' आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी कारभार स्वीकारल्यापासून राज्यभरात अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेबाबत एफडीएकडून जोरदार तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे. यामध्ये त्रुटी आढळणाऱ्या उपाहारगृहांना नोटीस देणे किंवा बंद करण्याची कारवाई करण्यात येत आहे. मुंबई महापालिका मुख्यालयातील पॅण्टीनदेखील एफडीएच्या कारवाईनंतर तब्बल महिनाभर बंद करण्यात आले होते. याच धर्तीवर आता पालिका प्रशासनाने आपल्या अखत्यारीतील सर्व उपाहारगृहांकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे.

**यावर राहणार नजर**

आस्थापना, परिसर, सुविधा
उपकरणे, भांडी, साहित्य
कच्चा माल व पुरवठा नियंत्रण
वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य
परिसरातील कीटक नियंत्रण
स्वच्छता व निर्जंतुकीकरण
कचरा व्यवस्थापन व्यवस्था
उत्पादने व ग्राहक जागरुकता
अन्न सुरक्षा व नोंदी.

## निबंधकांच्या मंजुरीनंतरच जन्म, मृत्यू नोंदणी रद्द; दुरुस्तीसाठी नवे कडक नियम




**मुंबई :** जन्म व मृत्यू नोंदवहीतील नोंदींमध्ये दुरुस्ती किंवा रद्दबातल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नवी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार मुख्य निबंधकांच्या मंजुरीशिवाय कोणत्याही जन्म किंवा मृत्यूच्या नोंदी रद्द करता येणार नाहीत.

आरोग्य सेवा संचालनालय व जन्म-मृत्यूचे मुख्य निबंधक यांनी ही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. दुरुस्ती करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीकडून लेखी अर्ज घेऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवळ शुद्धलेखन लेखनातील त्रुटी असल्यास आवश्यक पुराव्यांच्या आधारे दुरुस्ती करता येईल. मात्र मूळ नोंदीत बदल न करता त्याची नोंद 'शेरा' स्तंभात करावी लागणार आहे.मुलाचे नाव नोंदणीनंतर किंवा बदलल्यास ते जन्म नोंदीत थेट बदलण्याऐवजी 'अलियास' (ऊर्फ) स्वरूपात नोंदवण्याचा सल्ला देण्यात आला आहे तसेच पालकांचा घटस्फोट झाला म्हणून जन्म दाखल्यातून वडिलांचे नाव काढून टाकता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. जन्म किंवा मृत्यूनंतर पत्ता बदलला तरी तो दाखल्यात समाविष्ट करता येणार नाही.मुख्य जन्म किंवा मृत्यूची नोंद फसवणुकीने अथवा चुकीच्या पद्धतीने झाल्याचे आढळल्यास संबंधित प्रस्ताव जिल्हा निबंधकांमार्फत निबंधकांकडे पाठवावा लागेल. मुख्य निबंधकांच्या आदेशानंतरच सीआरएस (सिव्हिल रेजिस्ट्रशन सिस्टिम) पोर्टलवरील नोंद रद्द करता येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

## एसटी बसस्थानकांकर १२५ हिरकणी कक्ष, महिलांच्या सुरक्षेसाठी पाऊल




**मुंबई :** राज्यातील लाखो महिला प्रवाशांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानाच्या दृष्टीने एसटी महामंडळाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संपूर्ण राज्यभरातील एसटी बसस्थानकांवर १२५ हिरकणी कक्ष उभारण्यात येणार आहेत. यासाठी एसटी महामंडळाने 'टोयोटा किर्लोस्कर मोटर'सोबत सामंजस्य करार केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. स्तनदा मातांना प्रकासादरम्यान आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर ही कंपनी आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार राज्यातील एसटी बसस्थानकांकर अंदाजे ३ मीटर३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत.

**तीन वर्षांत कक्ष उभारण्याचे नियोजन**

सामंजस्य करारामधील नियोजनानुसार पुढील तीन आर्थिक वर्षांत एकूण १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये ५० कक्ष, २०२७-२८ मध्ये ५० कक्ष आणि २०२८-२९ मध्ये २५ कक्षांची उभारणी करण्यात येणार आहे.

## पाणी संकटासाठी टंचाई कृती आराखडा; गावांची यादी तयार करण्याची सूचना



**मुंबई :** सप्टेंबर महिना निम्मा उलटून गेल्यानंतरही राज्याच्या अनेक भागात पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे राज्यात पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने संभाव्य पाणीबाणीचा मुकाबला करण्यासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्यासाठी वेळापत्रक जाहीर केले आहे.

त्यानुसार ऑक्टोबर ते जून २०२७ अशा नऊ महिन्यांसाठी १५ नोव्हेंबर, २० डिसेंबर २०२६ आणि २० जानेवारी २०२७ ता तारखांना वेळापत्रक सादर करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

मंगळवारी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पीक पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाने ओढ दिल्याने राज्य सरकारने टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू केल्याची माहिती दिली होती.

त्यानुसार पाणी पुरवठा विभागाने बुधवारी पाणी टंचाई कृती आरखडा तयार करण्याबाबत शासन परिपत्रक जारी केले. त्यानुसार येत्या उन्हाळ्यात पाणी टंचाईची शक्यता असलेल्या गाव, वाड्यांची यादी तयार करून तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी त्याचा संयुक्त अहवाल ऑक्टोबर महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याची सूचना देण्यात आली आहे.

ज्या गावांना चालू वर्षी पाणी टंचाई निवारणासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशाच गावांचा टंचाई आरखडा तयार करून त्याची प्रत सरकारला सादर करावी. आराखडा तयार करताना संबंधित गावांची यादी, ग्रामपंचायतीचा प्रस्ताव तसेच मागील तीन वर्षांत टंचाई निवारणासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च विचारात घ्यावा, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**टँकर शेवटचा पर्याय**

एकूण १० पाणीटंचाई निवारणासाठीच्या उपाययोजनांपैकी टँकरने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजना वगळून उर्वरित नऊ उपाययोजनांना प्रथम प्राधान्य द्यावे. या नऊ उपाययोजना शक्य नसतील, अशा ठिकाणीच टँकर किंवा बैलगाडीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा. टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागल्यास टँकरच्या फेऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी निविदा स्वीकारताना तसेच टँकरधारकांशी करार करताना टँकरवर जीपीएस यंत्रणा बसविण्याची अट समाविष्ट करावी, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# दिव्यांगांना यूडीआयडी प्रमाणपत्रासाठी ग्राम, वॉर्डस्तरावर अभियान राबवा-उपसभापती सचिन अहिर



**मुंबई :** राज्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र (यूडीआयडी) विनासायास आणि मुदतीत उपलब्ध करून देण्यासाठी ग्राम व वॉर्ड स्तरापर्यंत विशेष अभियान राबवावे. अंगणवाडी सेविका तसेच आशा वर्कर यांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या घरी भेटी देऊन त्यांची माहिती संकलित करावी आणि पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले.

राज्यातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे बैठक झाली. या बैठकीस आमदार बच्चू कडू, दिव्यांग विभागाचे सचिव माणिक गुरसाळ, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, दिव्यांग सक्षमीकरणाचे आयुक्त सत्यजीत बडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपसभापती अहिर म्हणाले, दिव्यांग बांधवांना मुदतीत दिव्यांग प्रमाणपत्र मिळणे हा त्यांचा नैसर्गिक हक्क आहे. त्यामुळे आरोग्य विभाग आणि नगरपालिका, महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांच्या मागणीच्या याद्या तातडीने निकाली काढाव्यात. ग्रामविकास विभागाने ग्रामपंचायत स्तरावर दिव्यांग सक्षमीकरणासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती संकलित करून त्याचा आढावा घ्यावा. प्रत्येक विभागाने दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या पाच टक्के निधीचा प्रभावीपणे विनियोग करण्याची कार्यवाही करावी, असेही अहिर यांनी सांगितले.

दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना तत्काळ मिळेल, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्राबाबत प्राप्त तक्रारी तसेच संशयास्पद प्रमाणपत्रांची तपासणी करावी. दिव्यांगांसाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करावी. दिव्यांग कल्याण विभागाने दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजनेचा प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

## अंगणवाडी सेविका, मदतनीसांना ग्रॅच्युइटी देण्याबाबत शासन सकारात्मक : मंत्री आदिती तटकरे

**मुंबई :** पोषण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, समाजातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या माध्यमातून बालके, गरोदर माता आणि स्तनदा मातांपर्यंत पोहोचून सुदृढ महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना उपदान (ग्रॅच्युइटी) देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प योजनेअंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे ९व्या राष्ट्रीय पोषण माहाचा राज्यस्तरीय शुभारंभ महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाला. यंदाचा पोषण माह 'माझी अंगणवाडी, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित आहे.यावेळी महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, सहआयुक्त संगिता लोंढे, विजय क्षीरसागर, आयुषचे सहायक संचालक सुश्रुत मुक्कावार यांच्यासह विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, पोषण माहाच्या माध्यमातून बालके, गरोदर माता आणि स्तनदा मातांच्या आहार व आरोग्याबाबत जनजागृती करण्यासोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत आहे. यासाठी महिला व बालविकास, आरोग्य आणि आयुष विभागाने समन्वयाने काम करण्याची गरज आहे. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी जन्मापासूनच योग्य पद्धतीने शिशु अभ्यंग मिळणे आवश्यक असून, त्यांचे महत्व मातांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष विभागाचा सहभाग घेण्यात आला आहे. आयुषच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका व मदतनीसांना आवश्यक मार्गदर्शन देऊन ही माहिती मातांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.यंदाच्या 'माझी अंगणवाडी, माझी जबाबदारी' या संकल्पनेतून अंगणवाडी केंद्रे अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे. डिजिटल अंगणवाड्यांमधील स्क्रीनवर आयुष विभागाने तयार केलेले आरोग्य व पोषणविषयक व्हिडिओ नियमितपणे दाखवावेत आणि त्यातील माहिती गरोदर व स्तनदा मातांपर्यंत पोहोचवावी, असे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

## सरकारी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक औषधांचा साठा अनिवार्य; राज्य सरकारची नवी यादी लागू!



**मुंबई :** महाराष्ट्रातील सरकारी रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषधे बाहेरून विकत घ्यावी लागतात, अशी तक्रार अनेक वर्षांपासून सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्यभरातील सर्व सरकारी आरोग्य संस्थांसाठी आवश्यक औषध यादी आणि ऐच्छिक औषध यादी अंतिम करून लागू केली आहे. ९ सप्टेंबर २०२६ रोजी आरोग्य सेवा संचालनालयाने यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी करत सर्व संस्थाप्रमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी, उपसंचालक आणि जिल्हा शल्यचिकित्सकांना या नव्या नियमांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या या आदेशानुसार यापुढे प्रत्येक सरकारी आरोग्य संस्थेत ईडीएल यादीतील औषधे प्राधान्याने उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहणार आहे. या यादीची निर्मिती केंद्र सरकारच्या मानकांचा आधार घेऊन तसेच विविध वैद्यकीय तज्ज्ञ, अधिकारी आणि आरोग्य क्षेत्रातील समित्यांच्या सल्ल्यानुसार करण्यात आली आहे. यामध्ये सामान्य आजारांपासून ते गंभीर आजारांपर्यंत आवश्यक असलेल्या औषधांचा समावेश करण्यात आला असून, प्रत्येक स्तरावरील रुग्णालयांच्या क्षमतेनुसार औषधांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कोणती औषधे उपलब्ध असावीत, याचे स्पष्ट निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे रुग्णांना आवश्यक औषधे वेळेवर आणि विनामूल्य मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या नव्या औषध धोरणामध्ये ॲनेस्थेटिक्स, ॲंटीबायोटिक्स, ॲंटी-कॅन्सर औषधे, मधुमेहावरील औषधे, हृदयविकारावरील औषधे, विविध लसी, जीवनसत्त्वे तसेच इतर अत्यावश्यक औषधांचा समावेश करण्यात आला आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, रुग्णालयांनी या यादीतील औषधांचा पुरेसा साठा कायम ठेवणे आवश्यक असून, औषध पुरवठा आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याची जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुख आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांवर असेल.

## 'रेलवन' ॲपवरून काढता येणार इतरांसाठीही पास

**मुंबई :** लोकलच्या प्रवाशांसाठी तिकिट प्रणाली सोपी करण्याचा रेल्वेचा प्रयत्न आहे. त्यानुसार आता रेलवन ॲपवरून प्रवाशांना कुटुंबातील सदस्य किंवा अन्य पाच प्रवाशांसाठीही पास काढता येणार आहे. २ सप्टेंबरपासून ही सुविधा सुरू करण्यात आली. रेल्वे बोर्डाच्या मंजुरीनंतर रेल्वे माहिती प्रणाली केंद्राने मार्गदर्शक सूचना जारी केल्या. त्यानुसार पास पीडीएफ स्वरूपात शेअर करता येणार आहे. परंतु त्यामध्ये क्यूआर कोड आणि प्रवाशाचा फोटो स्पष्ट दिसणे आवश्यक असणार आहे. यामध्ये तफावत आढळल्यास कारवाई होणार आहे. केवळ चलन, आरक्षणाची पावती किंवा यूटीएसच्या कागदी पासची प्रत दाखवून प्रवास करता येणार नाही.स्वतःसाठी काढलेल्या पासची वैधता त्याच दिवसापासून सुरू होईल. मात्र, दुसऱ्या प्रवाशासाठी पासची वैधता बुकिंगनंतरच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होईल. स्वतःसाठी पास काढण्यासाठी वय किमान १८ वर्षे असावे. इतर प्रवाशाचे वय किमान पाच वर्षे असणे आवश्यक आहे. दरम्यान,नवीन सुविधा सुरू झाल्याने तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना अद्ययावत उपकरणे वापरण्याच्या सूचना आहेत. शेअर केलेल्या पासवर संबंधित प्रवाशाचा फोटो स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. पास तपासताना रेल्वे कर्मचारी आधी पासवरील फोटो आणि प्रत्यक्ष प्रवाशाचा चेहरा जुळवून पाहतील. गरज पडल्यास हातातील उपकरणाद्वारे क्यूआर कोड स्कॅन करून त्यातील फोटो आणि प्रवाशाची माहिती तपासली जाईल.

# ई-कॉमर्स क्षेत्रासाठी केंद्र सरकारचे नवे नियम जाहीर



**मुंबई :** ई-कॉमर्स क्षेत्रातील ग्राहक संरक्षण अधिक मजबूत करण्यासाठी आणि डिजिटल बाजारपेठेत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने 'कन्झ्युमर प्रोटेक्शन (ई-कॉमर्स)' नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. ग्राहक व्यवहार विभागाने गुरुवारी याबाबतची माहिती दिली असून, हे सुधारित नियम आगामी १ जानेवारी २०२७ पासून संपूर्ण देशभरात लागू होणार आहेत. डिजिटल बाजारपेठेतील बदलत्या पद्धती आणि ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे.

राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनशी समन्वय अनिवार्य : नवीन नियमांनुसार, प्रत्येक ई-कॉमर्स कंपनीला नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाईनच्या 'कन्व्हर्जन्स' प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी होईल. विशेष म्हणजे, २०२५ मध्ये NCH कडे आलेल्या एकूण १७ लाख ७१ हजार ६२२ तक्रारींपैकी तब्बल ५ लाख ११ हजार १९६ (सुमारे २९ टक्के) तक्रारी या एकट्या ई-कॉमर्स क्षेत्राशी संबंधित होत्या. तसेच, ग्राहकाच्या तक्रारीची नोंद 'ग्रिव्हन्स ऑफिसर'कडे झाल्यानंतर त्याची एक प्रत त्वरित तक्रारदाराला देणे कंपन्यांना बंधनकारक असेल.

उत्पादनांच्या किंमत कपातीबाबत आता फसवणूक टाळण्यासाठी कपातीनंतरची किंमत आणि पूर्वीची किंमत दोन्ही स्पष्टपणे दाखवाव्या लागतील. 'पूर्वीची किंमत' म्हणजे ती सवलत किंवा कपात जाहीर करण्यापूर्वीच्या मागील ३० दिवसांमधील त्या उत्पादनाची सर्वात कमी असलेली किंमत होय. तसेच कंपन्यांना डार्क पॅटर्न्सच्या पालन करत दरवर्षी स्वतःचे 'सेल्फ-ऑडिट' करावे लागेल आणि त्याचे प्रमाणपत्र प्रमुखपणे प्रदर्शित करावे लागेल.

**उत्पादनाची संपूर्ण माहिती आणि गोपनीयतेचे संरक्षण**

महत्त्वाची माहितीः ग्राहकांना माहितीपूर्ण निर्णय घेता यावा यासाठी 'बेस्ट बिफोर/यूज बिफोर' तारीख, रिटर्न व रिफंड धोरण, वॉरंटी, डिलिव्हरी आणि पेमेंटशी संबंधित तपशील देणे आवश्यक असेल.

डेटा प्रायव्हसीः ग्राहकाची स्पष्ट संमती घेतल्याशिवाय त्याची वैयक्तिक माहिती ठरवून दिलेल्या उद्देशांव्यतिरिक्त इतर कामासाठी वापरता येणार नाही.

**बंडल्ड फी बंदीः** प्लॅटफॉर्मशी संबंधित नसलेल्या इतर सेवांसाठी ग्राहकांकडून 'बंडल्ड फी' आकारण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, ज्यामध्ये लॉयल्टी किंवा मेंबरशिप कार्यक्रमांना काही अटींच्या अधीन राहून अपवाद असेल.

कन्झ्युमर प्रोटेक्शन ॲक्ट, २०१९ अंतर्गत येणारे हे सुधारित नियम 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'चा समतोल राखत कंपन्यांवर अनावश्यक बोजा न टाकता ग्राहकांच्या हितांचे पूर्ण संरक्षण करतील. तसेच डिजिटल बाजारपेठेत सर्व व्यवसायांना समान संधी मिळून एक पारदर्शक आणि जबाबदार परिसंस्था निर्माण होण्यास मदत होईल, असा सरकारचा दावा आहे.

## पालिका अभियंत्यांच्या बदल्या आता ऑनलाइन;

### एका विभागात तीन वर्षेच राहता येणार, पालिकेचे परिपत्रक जारी



**मुंबई :** मुंबई महापालिकेत बदल्या रेट कार्ड ठरले, असा आरोप भाजप आमदार मिहिर कोटेचा यांनी केला. त्यानंतर मुंबई महापालिकेने परिपत्रक जारी करत आता अभियंत्यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने होणार असून तीन वर्षांहून अधिक काळ एकाच विभागात असेल तर प्राधान्यक्रम सादर करावा लागणार आहे. पालिका या निर्णयामुळे आता बदल्यांवरुन होणाऱ्या आरोपांना पूर्णविराम मिळणार का याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेने २ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, एकाच खाते किंवा विभागात सलग तीन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ कार्यरत असलेल्या अभियंत्यांची बदली दरवर्षी १ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रक्रियेसाठी संबंधित अभियंत्यांना ५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करून बदलीसाठी प्राधान्यक्रम सादर करावा लागणार आहे. कर्मचाऱ्यांना किमान एक आणि कमाल पाच प्राधान्यक्रम देण्याची मुभा असेल. ऑफलाइन पद्धतीने प्राधान्यक्रम स्वीकारले जाणार नाहीत.

दिव्यांग किंवा वैद्यकीय कारणांमुळे बदलीची आवश्यकता असलेल्या कर्मचाऱ्यांनाही ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे.

पालिका प्रशासनाच्या मते, उपलब्ध रिक्त पदे, प्रशासकीय आवश्यकता आणि लागू नियमांचा विचार करून संगणकीकृत रॅण्डमायझेशन प्रणालीद्वारे अंतिम निर्णय घेतला जाईल.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते

# महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा सन्मान



**नवी दिल्ली :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन, संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६' ने गौरव करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे आज वितरण करण्यात आले.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभाग आणि उच्च शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. देशभरातील ४८ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक आणि १३ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षक, अशा एकूण ८२ शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र, पदक आणि ५० हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव अनिल कुमार, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**शिक्षकांचा सन्मान हाच प्रगत समाजाचा पाया**

पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, चारित्र्याला आणि विचारांना आकार देऊन सशक्त राष्ट्राची पायाभरणी करतात, असे त्यांनी सांगितले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मृतीस अभिवादन करताना राष्ट्रपतींनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रवींद्रनाथ टागोर आणि गोपाळबंधू दास यांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. अंदमान-निकोबारपासून लडाखपर्यंत दुर्गम आणि ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाचे त्यांनी कौतुक केले. भारताला जगाची ज्ञान आणि कौशल्याची राजधानी बनविण्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच तंत्रज्ञान, नैतिक मूल्ये आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहनही राष्ट्रपतींनी केले.

## शालेय दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी 'स्कूल बॅग पॉलिसी २०२०'ची काटेकोर अंमलबजावणी करा : प्राथमिक शिक्षण संचालनालय

**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करून शिक्षण प्रक्रिया अधिक आनंददायी, सुलभ व कृतीप्रधान करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'स्कूल बॅग पॉलिसी-२०२०' ची सर्व प्रकारच्या शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शारीरिक वजनाच्या साधारणतः १० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, याची काटेकोर दक्षता शाळांनी घ्यावी, असे शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे.जास्त वजनाच्या दप्तरामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीचा कणा, खांदे व शारीरिक वाढीवर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या धोरणानुसार, पूर्व-प्राथमिक वर्गातील लहान मुलांना शक्यतो शाळेत दप्तर आणण्याची आवश्यकता भासणार नाही, या दृष्टीने शाळांनी नियोजन करावे. मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दररोज अनावश्यक पाठ्यपुस्तके, वह्या किंवा इतर शैक्षणिक साहित्य आणण्यास सांगू नये, तसेच त्या दिवसासाठी आवश्यक असलेलीच पुस्तके आणली जावीत



यासाठी वर्गनिहाय 'दप्तर वेळापत्रक' तयार करावे. याशिवाय, विद्यार्थ्यांनी दररोज सर्व पुस्तके घरी नेण्याची आवश्यकता भासू नये म्हणून शाळांनी वर्गखोल्यांमध्ये कपाटे, शेल्फ किंवा लॉकरची सुरक्षित व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. घरातून जड पाण्याची बाटली वाहून आणावी लागू नये यासाठी शाळांनी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि स्कूल बॅग पॉलिसीनुसार, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात १० दिवसांचा दप्तरविरहित कालावधी आयोजित करण्यात यावा. या कालावधीत स्थानिक कारागीर व व्यावसायिकांच्या मार्गदर्शनाखाली सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी बनविणे, हस्तकला, कृषीविषयक व स्थानिक व्यवसायांची ओळख यांसारखे प्रत्यक्ष अनुभवाधारित उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच वर्षभरात क्रीडा, बौद्धिक खेळ, वाचन, कथाकथन, पर्यावरण संवर्धन आणि क्षेत्रभेटी अशा कृतीप्रधान दिवसांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळांनी विद्यार्थ्यांच्या व दप्तराच्या वजनाची नियमित तपासणी करून त्याची नोंदवहीत नोंद ठेवावी आणि वजन निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास तत्काळ सुधारणा करावी. पालक सभांमधूनही पालकांना दप्तरात अनावश्यक वस्तू न ठेवण्याबाबत मार्गदर्शन करावे.

## एसआरए मुख्यालय झाले हायटेक, २२ सेवांसाठी चार किऑस्क मशिन्स बसवल्या



**मुंबई :** वारस हस्तांतरण किंवा सदनिका हस्तांतरणासाठी अर्ज, घरभाडे मिळत नसल्याच्या तक्रारी अशा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी (एसआरए) संबंधित विविध कामांसाठी आता सर्वसामान्य झोपडीधारकांना वारंवार अधिकाऱ्यांच्या दालनात चकरा मारण्याची गरज भासणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी एसआरएच्या वांद्रे (पूर्व) येथील मुख्यालयात चार किऑस्क मशिन्स बसवण्यात आल्या असून, त्याद्वारे २२ प्रकारच्या सेवा झटपट मिळणार आहेत.

दिवसाला शेकडो झोपडीधारक आपल्या वेगवेगळ्या कामांसाठी एसआरए मुख्यालयात येतात. मात्र आपली तक्रार कुठे आणि कशी नोंदवावी, घराच्या हस्तांतरणासाठी अर्ज कुठे करावा याबाबत पुरेशी माहिती नसते. त्यामुळे एसआरएने २२ प्रकारच्या सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु ज्यांना ऑनलाइन सेवेचा लाभ घेण्यात अडचणी येतात, अशा झोपडीधारकांसाठी आता मुख्यालयात चार किऑस्क मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. यापैकी दोन मशिन्स 'मैत्री' कक्षात, तर दोन मशिन्स इतर ठिकाणी आहेत. त्यावर नागरिकांना मोबाइल क्रमांक नोंदवून तक्रारी किंवा अर्ज करता येणार आहेत. प्रत्येक नागरिकाला किऑस्क मशिनचा वापर करणे शक्य होईलच असे नाही, त्यामुळे अशा झोपडीधारकांसाठी मदतनीस उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी ३ महिन्यांची मुदतवाढ




**मुंबई :** २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अभियांत्रिक, वैद्यकीय तसेच अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी राज्य सरकारने तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ होईल. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत शेकडो विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. परंतु, जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब होत असल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. यामुळे राज्य सरकारने परिपत्रक जारी करून तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असणार आहे.

# गणेश चतुर्थीः इतिहास, महत्त्व, कथा आणि पूजा

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया! ' ही घोषणा ऐकताच महाराष्ट्राच्या आणि अवघ्या भारताच्या वातावरणात एक विलक्षण चैतन्य, उत्साह आणि भक्तीचा संचार होतो. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्थी, म्हणजेच गणेश चतुर्थी! हा केवळ एक सण नाही, तर तो आपल्या सर्वांसाठी एक उत्सव, एक श्रद्धा आणि एक परंपरेचा अनमोल ठेवा आहे. बुद्धीची देवता, विघ्नहर्ता, आणि १४ विद्या व ६४ कलांचा स्वामी असलेल्या श्री गणेशाचा हा जन्मसोहळा.




पौराणिक आणि ऐतिहासिक मुळे

'स्कंद पुराण', 'भविष्य पुराण' आणि 'ब्रह्मवैवर्त पुराण' यांसारख्या अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये गणपतीच्या पूजेचा आणि व्रताचा उल्लेख आढळतो. गणेशाला 'प्रथम पूजनीय' म्हणजेच कोणत्याही पूजेच्या सुरुवातीला पहिला मान दिला जातो. ऐतिहासिकदृष्ट्या, सातवाहन, राष्ट्रकूट आणि चालुक्य या राजवटींमध्येही गणेश पूजन प्रचलित होते. पुढे, पुण्यामध्ये पेशव्यांच्या काळात तर हा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात असे, पण तो मुख्यतः घरगुती आणि खाजगी स्वरूपाचा होता.

**सार्वजनिक गणेशोत्सवाची क्रांतीः लोकमान्य टिळकांचे योगदान**

आज आपण जो जल्लोषपूर्ण सार्वजनिक गणेशोत्सव पाहतो, त्याचे संपूर्ण श्रेय जाते ते स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना. १८९३ सालचा तो काळ. भारत ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात होता. ब्रिटिशांनी भारतीयांच्या एकत्र येण्यावर आणि सभांवर कडक निर्बंध लादले होते. अशा वेळी लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवण्यासाठी आणि त्यांना एकत्र आणण्यासाठी टिळकांना एका व्यासपीठाची गरज होती.

धार्मिक उत्सवावर ब्रिटिश सरकार थेट बंदी घालू शकत नाही, हे ओळखून टिळकांनी अत्यंत दूरदृष्टीने घरगुती गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्यांचे दोन मुख्य उद्देश होतेः

सामाजिक ऐक्यः सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करावा, जेणेकरून त्यांच्यातील मतभेद दूर होऊन एकीची भावना वाढेल.

**गणेश चतुर्थीचे महत्त्वः केवळ उत्सव नाही, तर एक जीवनप्रणाली**

गणेश चतुर्थीचे महत्त्व हे अनेक स्तरांवर विभागलेले आहे, जे आपल्या जीवनाला एक नवी दिशा देते.

आध्यात्मिक आणि वैयक्तिक महत्त्व

विघ्नहर्ताः गणेश म्हणजे 'गणांचा ईश' अर्थात स्वामी. ते आपल्या मार्गातील सर्व अडथळे (विघ्न) दूर करतात. म्हणूनच प्रत्येक शुभ कार्याची सुरुवात 'श्रीगणेशाय नमः' म्हणून केली जाते.

बुद्धी आणि ज्ञानाचे प्रतीकः गणेशाचे मोठे डोके हे बुद्धिमत्ता आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. मोठे कान म्हणजे जास्त ऐकावे आणि लहान तोंड म्हणजे कमी बोलावे. त्यांची सोंड 'ॐ' काराचे प्रतीक मानली जाते.

**घरगुती गणेश पूजा विधीः बाप्पाचे स्वागत कसे करावे?**

घरी गणपती बसवण्याचा आनंद काही वेगळाच असतो. गणेश पूजा विधी अत्यंत श्रद्धेने आणि सोप्या पद्धतीने कसा करावा, याची माहिती खाली दिली आहे.

**पूजेची तयारी आणि मूर्ती स्थापना**

स्वच्छताः मूर्ती आणण्यापूर्वी संपूर्ण घर स्वच्छ करावे. वातावरण प्रसन्न आणि पवित्र ठेवावे.

स्थापनाः एका स्वच्छ पाटावर किंवा चौरंगावर लाल वस्त्र अंथरून, त्यावर अक्षता (तांदूळ) ठेवाव्यात. त्यावर श्रीगणेशाची मूर्ती स्थापित करावी. मूर्तीचें तोंड शक्यतो पूर्व किंवा उत्तर दिशेला असावे.

सोळा उपचारांची षोडशोपचार पूजा

शास्त्रानुसार १६ टप्प्यांमध्ये पूजा केली जाते, पण आपण त्यातील काही महत्त्वाचे टप्पे सोप्या पद्धतीने करू शकतो.

ध्यान आणि आवाहनः हात जोडून गणेशाचे ध्यान करावे आणि 'ॐ गं गणपतये नमः' या मंत्राने त्यांचे आवाहन करावे.

स्नानः मूर्तीवर थोडे पाणी (गंगाजल असल्यास उत्तम) शिंपडून स्नान घालावे.

वस्त्र आणि अलंकारः मूर्तीला कापसाचे वस्त्र (वस्त्रमाळ), जानवे अर्पण करावे.

गंध, अक्षता, फुलेः मूर्तीला चंदन किंवा कुंकवाचा टिळा लावावा. अक्षता वाहाव्यात. जास्वंदीचे लाल फूल, शमीची पाने आणि विशेषतः दुर्वा वाहाव्यात. गणेशाला दुर्वा अत्यंत प्रिय आहेत.

धूप-दीपः अगरबत्ती आणि तुपाचा दिवा ओवाळावा. नैवेद्यः गणपती बाप्पाला त्यांच्या आवडत्या मोदकांचा नैवेद्य दाखवावा. यासोबत इतर फळे आणि मिठाई अर्पण करावी. आरतीः कापूर लावून 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती कुटुंबासोबत मिळून म्हणावी. प्रदक्षिणा आणि प्रार्थनाः पूजेनंतर गणेशाला प्रदक्षिणा घालून आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करावी.

पौराणिक कथाः गणेशाच्या जन्माची आणि पराक्रमाची गाथा

प्रत्येक सणामागे एक सुंदर कथा दडलेली असते. गणेश जन्म कथा ही त्यापैकीच एक.

एकदा माता पार्वती स्नानासाठी जात होत्या. आपले रक्षण करण्यासाठी त्यांनी आपल्या अंगावरील मळापासून एका तेजस्वी बालकाची मूर्ती घडवली आणि तिच्यात प्राण फुंकले. त्याला दारात बसवून, कोणालाही आत येऊ न देण्याची आज्ञा दिली. काही वेळाने तिथे भगवान शंकर आले. बाल गणेशाने त्यांना ओळखले नाही आणि आपला हट्ट न सोडता त्यांना अडवले. दोघांमध्ये मोठे युद्ध झाले आणि भगवान शंकरांनी क्रोधाच्या भरात त्रिशूळाने त्या बालकाचे शीर धडावेगळे केले.

माता पार्वती बाहेर आल्या आणि आपल्या पुत्राला मृत अवस्थेत पाहून विलाप करू लागल्या. त्यांचा क्रोध इतका वाढला की सृष्टीचा विनाश होण्याची शक्यता निर्माण झाली. तेव्हा सर्व देवांनी भगवान शंकरांची विनवणी केली. शंकरांनी आपल्या गणांना आज्ञा दिली की, 'उत्तरेकडे तोंड करून झोपलेल्या कोणत्याही प्राण्याचे शीर घेऊन या.' गणांना एक हत्तीचे पिल्लू दिसले आणि त्यांनी त्याचे शीर आणले. भगवान शिवांनी ते शीर बालकाच्या धडाला जोडले आणि त्याला पुन्हा जिवंत केले. अशा प्रकारे, तो 'गजानन' झाला. तेव्हा सर्व देवांनी गणेशाला 'सर्वांमध्ये प्रथम पूजनीय' आणि 'विघ्नहर्ता' होण्याचा आशीर्वाद दिला.

# गणपती बाप्पाचा आवडता नैवेद्य म्हणजे मोदक





गणपती बाप्पाचा आवडता नैवेद्य म्हणजे मोदक. यामुळे गणपतीच्या दिवसांमध्ये घरोघरी बाप्पाच्या आवडीचे मोदक बनवले जातात. यात वेगवेगळ्या प्रकारचे मोदक महिला आवर्जुन बनवतात. अशाच काही मोदकांची रेसिपी आम्ही सांगणार आहोत.

**उकडीचे मोदक**

साहीत्य-२ वाट्या एका नारळाचा चव ( सारण, पावडक, किस), दीड वाटी बारीक चिरलेला गूळ,१ चमचा वेलचीपूड,२ वाट्या पाणी, २ वाट्या तांदळाचं पीठ,१ चमचा तूप,

**कृती-** सर्वप्रथम मंद गॅसवर कढईत नारळ, गूळ आणि वेलची पूड एकत्रपणे भाजून घ्या. नारळ कोरडे व्हायला लागले की गॅस बंद करा. दुसरीकडे गॅसवर एका पातेल्यात दोन वाट्या पाणी घालून त्यात एक चमचा तूप आणि चवीपुरतं मीठ घाला. पाण्याला उकळी आली की त्यात दोन वाट्या तांदूळ पीठ घालून चांगले ढवळून घ्या. पातेल्यावर झाकण ठेवा. वाफ येऊ द्या. पीठ कोमट झाल्यावर चांगले मळून घ्या.

पीठाच्या गोळ्याची वाटी सारख्या आकाराची पारी करा. त्यात नारळाचे सारण भरा. त्याला मोदकाचा आकार देत सगळ्या बाजूंनी बंद करा. नंतर मोदकाच्या साच्याला आतून तूप लावा. त्यात हे मोदक भरा. हलक्या हाताने साचा दाबा. सुंदर आणि सुबक असे मोदक तयार .

**नारळाचे इन्स्टंट मोदक**

**साहीत्य-** दोन वाटी नारळाचा चव, पाव वाटी तूप, (मिल्कमेड) कंडेस्ड मिल्क अंदाजानुसार, २ चमचे वेलची पावडर, २ चमचे चारोळी,२ चमचे बदाम-काजूचे बारीक काप, खाण्याचा रंग

